MHKO130002052015

**नियमीत दिवाणी दावा क्र.४३/२०१५ मधील**
**निशाणी ३९ खालील आदेश**
**श्रीमती आनंदी चंद्रकांत कमळकर**
**वि.**
**नेताजी चंद्रकांत कमळकर**

वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज साक्षीदारास साक्षीसमन्स काढण्यासाठी केलेला आहे.

०२. वादी यांचे असे कथन आहे की, वादी यांनी प्रस्तुतचा दावा हक्कज्ञापन, वाटप, मनाई इत्यादीसाठी दाखल केलेला आहे. यातील वादी यांचा विवाह कै. चंद्रकांत केदारी कमळकर, रा. जवाहरनगर, इचलकरंजी यांचेशी दिनांक ०९/०५/१९९८ रोजी संपन्न झालेला आहे. सदर विवाहाची नोंदणी दिनांक १०/०३/००५ रोजी करणेत आलेली आहे. त्याबाबतचे विवाह नोंदणी प्रमाणपत्र मा. नोंदणी निरीक्षक, विवाह निबंधक, दुय्यम निबंधक कार्यालय, इचलकरंजी, ता. हातकणंगले जि. कोल्हापूर यांनी वादीस दिलेले आहे. सदरचे मुळ विवाह नोंदणी प्रमाणपत्र याकामी निशाणी क्र. ३ सोबत अ.क्र. १२ वर हजर केलेले आहे. याकामी प्रतिवादी यांनी वादीचा विवाह झालेला नाही, अशी मुख्यतः तक्रार दाव्याचे कामी घेतलेली आहे. सबब, वादीचा विवाह कै. चंद्रकांत केदारी कमळकर यांचेशी झालेबाबत शाबीतीसाठी संबंधीत मा. नोंदणी निरीक्षक, विवाह निबंधक, दुय्यम निबंधक कार्यालय, इचलकरंजी, जि. कोल्हापूर यांनी साक्षीस हजर राहणसे आवश्यक आहे. तसेच संबंधीत साक्षीदार यांनी साक्षीस येतेवेळी विवाह प्रमाणपत्रासोबत जोडलेली सर्व मुळ कागदपत्रे घेऊन हजर राहणेबाबत साक्षीसमन्समध्ये सुचना असाव्यात. संबंधीत साक्षीदाराचा नियमाप्रमाणे होणारा भत्ता साक्षीचेवेळी वादी हया प्रत्यक्ष देत आहे. सबब, सदरचा अर्ज मंजुर करण्याची विनंती केली आहे.

०३. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जास आपले म्हणणे दाखल करुन सदरचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे. प्रतिवादी यांचे असे कथन आहे की,

अर्जातील कथने चुकीची आहेत. अर्ज कायदयाने चालणेस पात्र नाही अर्ज केवळ वेळ घालविणेकरीता दिलेला आहे. सबब, सदरचा अर्ज नामंजुर करणची विनंती प्रतिवादी यांनी केली आहे.

०४. अर्ज व म्हणणे वाचले. दोन्ही बाजुच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

०५. अभिलेखाचे आवलोकन केले असता वादीचा दावा हा मुख्यतः वाटणीसाठी असुन हक्कज्ञापन व मनाईसाठी आहे. वादीच्या कथनांप्रमाणे त्या चंद्रकांत केदारी कमळकर यांच्या दुस-या पत्नी असून त्यांचा विवाह ०९/०५/१९९८ रोजी झाला आहे. त्यांचा विवाह चंद्रकांत यांच्या पहिल्या पत्नी अंजना यांचा दिनांक ११/०१/१९९८ रोजी मृत्यू झाल्याने तो झाला आहे. वादीच्या कथनांप्रमाणे प्रतिवादी नं. १-अ ते १-क हया चंद्रकांत व त्यांच्या पहिल्या पत्नी अंजना यांची मुले आहेत. प्रतिवादी क्र. १-अ  व ब यांनी निशाणी १४ वर त्यांचे म्हणणे दाखल केले आहे. त्यांनी वादीचा त्यांचे वडील चंद्रकांत यांच्याशी कोणतेही संबंध नसल्याचे नमुद केले आहे. त्यामुळे प्रस्तुत अर्जाच्या कथनांनुसार वादी या ' चंद्रकांत केदारी कमळकर यांच्या कायदेशीर पत्नी आहेत का?' असा मुद्दा निशाणी १८ वर काढण्यात आला आहे. त्याअनुषंगाने वादीवर सदर मुद्दा शाबीत करण्याची जबाबदारी असून त्यासाठी त्यांना प्रस्तुत अर्जात नमुद केल्याप्रमाणे पुरावा सादर करावयाचा आहे. सदर पुरावा हा मुद्दा क्र. १ याच्या निगडीत असून दोन्ही पक्षकारांच्या मध्ये असलेल्या समस्याचे निरासन करण्यासाठी महत्वाचे आहे. वादी संबंधीत साक्षीदाराचा भत्ता देण्यास तयार आहे. त्यामुळे सदर अर्ज मान्य केल्यास प्रतिवादीला संबंधीत साक्षीदाराची उलटतपास घेण्याची संधी उपलब्ध असून त्याप्रमाणे पुढील पावले उचलण्याची मुभा आहे. वरील सर्व कारणामुळे प्रस्तुत अर्ज मंजुर करण्यात येत आहे. सबब, पुढील प्रमाणे आदेश -

**आदेश**

१. अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. नोंदणी निरीक्षक, विवाह निबंधक, दुय्यम निबंधक कार्यालय, इचलकरंजी, ता. हातकणंगले जि. कोल्हापूर यांना वादी व चंद्रकांत केदारी कमळकर यांच्या विवाह प्रमाणपत्र तसेच संबंधीत कागदपत्रे

सोबत आणण्यास साक्षीसाठी हजर राहण्यास साक्षीसमन्स पाठवावे.

Vijaya Narayanrao Katkar
Digitally signed by Vijaya Narayanrao Katkar
Date: 2021.03.23 17:29:20 +0530

**ठिकाण – कागल** **(काटकर विजया एन. एस.)**

**दिनांक २२/०३/२०२१** **सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,**

**कागल**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/order are same, word to word, as per the original Judgment/order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | :- | Sidram V. Kamble |
| Name of Court | :- | Katkar Vijaya N.S. Jt. Civil Judge (Jr.Dn.), Kagal. |
| Date of dictation/typed | :- | 22/03/2021 |
| Judgment/order signed by the P.O. on | :- | 22/03/2021 |
| Judgment/order uploaded on | :- | 22/03/2021 |